**गैरअर्जदारांतर्फे उलटतपास– श्री. राहुल पंडीत वकील.**

**२२.** माझे शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे करण्यात आले असून मला आवश्यक असलेला संपुर्ण मजकूर त्यात लिहिलेला आहे. माझे डिप्लोमा आय. टी. इंजिनिअरींगचे शिक्षण झाले आहे. मी हे प्रकरण दाखल करण्यापूर्वी सचिन व इतरांच्या विरोधात पोलिस ठाण्यात कोणतीही तक्रार दिलेली नाही. मी माझ्या शपथपत्रात उल्लेख केलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या पावत्या पुढील तारखेला हजर करु शकते. मला सचिनने दि. १०.१०.२०२२ रोजी नांदावयास येण्याबाबत नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या नोटीसीला प्रतिउत्तर देऊन नांदायला जाण्यास नकार दिला होता.

**२३.** मी नांदायला गेलेले नसल्यामुळे सचिनने माझ्या विरोधात पनवेल न्यायालयात नांदावयास येण्याबाबतचा दावा दाखल केलेला आहे. मी त्या दाव्यात हजर होऊन माझे लेखी म्हणणे दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या लेखी म्हणण्यातून नांदावयास जाण्यास नकार दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदण्यास जाण्यास नकार दिल्यामुळे सचिनने तो दावा काढून घेऊन घटस्फोटाचा दावा दाखल केला आहे. सचिनने घटस्फोटाचा दावा दाखल केल्यानंतर मी प्रस्तूतचे प्रकरण दाखल केले आहे.

**२४.** मी मोबाईल वापरत असून मला त्यामध्ये ऑडिओ व्हीडीओ रेकॉर्ड करता येतात. मी माझ्या तक्रारीमध्ये केलेल्या हिंसाचाराचे व्हीडीओ ऑडिओ रेकॉर्डींग केलेले नाही. मी माझ्यावरती झालेल्या हिंसाचारा बाबत माझ्या आई– वडिलांना *व्हॉटस् ॲप* मेसेजद्वारे कळवलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सचिन सोबत नांदायचे नसल्यामुळे मी सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. मला सचिनच्या घरचे आजूबाजूच्या लोकांशी बोलू देत नव्हते. मी सचिनच्या घराच्या आजूबाजूला राहणा–या लोकांना ओळखत नाही.

(गैरअर्जदारांच्या वकिलांच्या विनंती अर्जावरुन उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)

**उलटतपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - २०.०४.२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.